**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,धुळे व**

**शिक्षण विभाग (प्राथ.),जि.प. धुळे**

**पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ५ वी) २०२४**

**सराव परीक्षा प्रश्नपत्रिका**

**पेपर क्रमांक १** **विषय :– प्रथम भाषा व गणित**

**बैठक क्रमांक –** **एकूण गुण : १५०**

**प्रश्नपत्रिका सोडविण्यापूर्वी कृपया खालील सूचना काळजीपूर्वक वाचा.**

(1) या प्रश्नपत्रिकेत दोन विभाग आहेत. त्यापैकी विभाग I मध्ये प्रथम भाषा विषयासाठी 1 **ते** 25 व विभाग II मध्ये गणित विषयासाठी 26 ते 75 असे एकूण 75 प्रश्न आहेत. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(2) प्रत्येक प्रश्नासाठी 2 गुण आहेत.

(3) प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी एकूण 90 मिनिटांचा कालावधी दिला जाईल.

(4) उत्तरे नोंदविण्यासाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिलेली आहे. प्रत्येक प्रश्नक्रमांकासमोर चार पयायांसाठी क्रमागत वर्तुळे दिलेली आहेत. त्यातील अचूक उत्तराचा पर्याय क्रमांक असलेले वर्तुळ पुढील उदाहरणात दाखविल्याप्रमाणे रंगवा.

उदा. प्रश्न क्र. 6 च्या बरोबर उत्तराचा पर्याय क्र. 2 असेल, तर तो पुढीलप्रमाणे नोंदवावा.

प्रश्न क्र. 6 ① ● ③ ④

(5) खालीलप्रमाणे नोंदविलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. असे उत्तर नोंदविल्यास त्या प्रश्नास 'शून्य' गुण दिले जातील.

① ② ● ④

(6) पर्यायाची उत्तरे नोंदविताना फक्त काळ्या किंवा निळ्या रंगाच्या बॉलपेनचाच वापर करावा. पेन्सिलने नोंदविलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

(7) **एकदा नोंदविलेली उत्तरे पुन्हा बदलता येणार नाहीत.**

(8) **प्रत्येक प्रश्नासाठी एकापेक्षा अधिक वर्तुळात नोंदविलेली उत्तरे, खाडाखोड करून नोंदविलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.**

(9) प्रश्नपत्रिकेत **प्रत्येक पानावर खाली** व **शेवटच्या पानावर** कच्चे काम करण्यासाठी मोकळी जागा आहे, तेथेच कच्चे काम करावे.

(10) परीक्षेस मर्यादित वेळ असल्याने एखाद्या प्रश्नाचे उत्तर तुम्हाला येत नसल्यास पुढील प्रश्न सोडवा. शेवटी वेळ शिल्लक राहिल्यास उरलेल्या प्रश्नांसाठी पुन्हा प्रयत्न करा.

(11) एखाद्या प्रश्नात त्रुटी/चूक आढळल्यास त्याबाबत पर्यवेक्षक किंवा परीक्षा केंद्रसंचालक यांच्याकडे विचारणा करू नये.

(12) प्रश्नातील त्रुटी/चूक/आक्षेपाबाबतचे निवेदन शाळेने किंवा पालकांनी गटशिक्षणाधिकारी किंवा शिक्षणाधिकारी यांच्याकडे लेखी स्वरूपात न पाठवता संबंधित शाळेच्या लॉगीन मधून ऑनलाईन पद्धतीनेच पाठवावे.

(13) त्रुटी/चूक/आक्षेपाबाबतचे निवेदन ऑनलाईन पद्धतीने पाठविण्याची मुदत परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर अंतरिम (तात्पुरती) उत्तरसूची प्रसिद्ध झाल्यापासून 10 (दहा) दिवसांपर्यंत राहील.

(14) मुद्रणदोष किंवा अन्य कारणांमुळे प्रश्न चुकीचा असल्याचे आढळल्यास तज्ज्ञ समितीच्या अभिप्रायानुसार तो रद्द केला जाईल.

(15) मूळ माध्यमासोबत इंग्रजी भाषेतील प्रश्नपत्रिका दिलेली आहे. मूळ माध्यमातील संदिग्ध प्रश्नांबाबत इंग्रजी प्रश्न पहावेत.

# विभाग I

## प्रथम भाषा

**प्रश्न 1 ते 3 साठी सूचना - खालील उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरांचा योग्य पर्याय निवडा.**

मायाला दोन बहिणी होत्या. तिच्या आईला या तिघींनाही शिकवून स्वत:च्या पायावर उभं करायचं होतं. मायाचे वडील सतत आजारी असत, त्यामुळे आईलाच कष्ट करावे लागत. तिने दुसऱ्यांचे कपडे शिवून अर्थार्जन केले. खूप कष्ट केले पण मुलींच्या शिक्षणासाठी काही कमी पडू दिले नाही.

प्राथमिक शाळा महानगरपालिकेची असल्याने शालेय खर्चाचा प्रश्न नव्हता. त्यातून मायाने शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळविले होते. मायाने खूप जिद्दीने अभ्यास करून इंजिनिअरिंगला प्रवेश मिळवला. तिचे देदिप्यमान यश म्हणजे ती विद्यापीठात प्रथम क्रमांकाने पास झाली. दोन वर्षे नोकरी करून पैसे जमवले. जर्मनीला जाऊन पुढील शिक्षणही पूर्ण केले. परदेशात गेल्यावर आईने तिला बजावले. ''शिक्षण पूर्ण झाल्यावर देशासाठीच काम कर.'' माया आणि मायाची आई यांची जिद्द वाखाणण्याजोगी आहे.

**1. पैसे मिळविण्यासाठी मायाच्या आईने कोणते काम केले ?**

(1) शिवणकाम
(2) धुणीभांडी
(3) नोकरी
(4) भाजीविक्री

**2. 'माया हुशार मुलगी होती.' हे पुढीलपैकी कोणत्या वाक्यावरून दिसत नाही ?**

(1) तिने शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळविले
(2) ती विद्यापीठात प्रथम क्रमांकाने पास झाली
(3) तिने जर्मनीला जाऊन पुढील शिक्षण पूर्ण केले
(4) तिचे वडील सतत आजारी असत.

**3. मायाच्या आईचे मातृभूमीवरील प्रेम कशावरून दिसून येते ?**

(1) मुलींना शिकवले
(2) मुलीला देशासाठीच काम करण्यास सांगितले
(3) खूप कष्ट केले
(4) मुलीला शिक्षणासाठी देशाबाहेर जाऊ दिले

Space for Rough Work

**प्रश्न 4 ते 6 साठी सूचना – पुढील कविता काळजीपूर्वक वाचून त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरांचा योग्य पर्याय निवडा.**

उभारून कर उभे माड हे
शिरीं वीरांपरी झेलीत वृष्टी
जरा पहावे क्षितिजावर तर
बुडून जाते धुक्यात दृष्टी

हिरवी झाडे – शामल डोंगर
धुसर निळसर तलम हवा ही
लाल गढूळ जलातून वाहे
उसळत खिदळत चंचल काही

भिजून गेले पंख तरीही
बसला तारांवरती पक्षी
मधेच ठिबके थेंब कोवळा
फुलवित जळी वलयांची नक्षी

ध्वज मिरवीत काजळी धुराचा
आगगाडी ये दुरून उत्सुक
खडखड धडधड आज तिचीपण
भिजून झाली हळवी नाजूक

**4. माडांना कोणाची उपमा दिली आहे ?**

(1) क्षितिजाची (2) डोंगराची

(3) वीराची (4) धूराची

**5. पुढीलपैकी कोणत्या शब्दाचा समानार्थी शब्द कवितेत आला नाही ?**

(1) पाणी (2) नेत्र

(3) पाऊस (4) झेंडा

Space for Rough Work

**6. पाण्यावर वर्तुळांची नक्षी कोण फुलविते ?**

(1) निळसर तलम हवा (2) धुक्यात हरवलेली दृष्टी

(3) दुरून येणारी आगगाडी (4) पक्ष्याच्या पंखावरून ठिबकणारा पावसाचा थेंब

**7. खाली दिलेल्या वाक्यात एकूण सर्वनामे किती आहेत ?**

'दारामागे कोण लपलंय ? त्यांना मी पाहिलंय बरं का !'

(1) तीन (2) चार

(3) दोन (4) पाच

**8. अधोरेखित शब्दाचे लिंग ओळखा :**

'रंगीबेरंगी पतंगांनी आकाश सजले होते.'

(1) नपुंसकलिंग (2) उभयलिंग

(3) पुल्लिंग (4) स्त्रिलिंग

**9. खाली दिलेल्या वाक्यातील काळ कोणता ?**

'खेळणी तयार करायला बुरडाघरच्या कांबट्या आणाव्या लागायच्या.'

(1) वर्तमानकाळ (2) साधाकाळ

(3) भूतकाळ (4) भविष्यकाळ

**10. पुढीलपैकी अशुद्ध शब्दाचा पर्याय निवडा :**

(1) दुर्घटना (2) मैत्रीणी

(3) उत्तुंग (4) सुरपारंबी

**11. पुढीलपैकी एकवचन-अनेकवचनाची अयोग्य जोडी कोणती ?**

(1) चादर – चादरी (2) झालर – झालरी

(3) किनार – किनारी (4) वानर – वानरी

Space for Rough Work

**12. खालील वाक्य अर्थपूर्ण होण्यासाठी योग्य पर्याय निवडा.**

आपली लबाडी पकडली जाईल या भीतीने मोहन चे/च्या/ची.........

(1) पाय लटलट कापले
(2) पोटात बाकबूक झाले
(3) बोबडी वळली
(4) तोंड पांढरे पडले

**13. खाली दिलेल्या अर्थाची योग्य म्हण पर्यायांतून निवडा :**

'क्षुद्र माणसे क्षुद्र वस्तूनां भाळतात.'

(1) गाढवाला गुळाची चव काय ?
(2) कोल्ह्याला द्राक्षे आंबट
(3) कोल्हा काकडीला राजी
(4) अडला हरी गाढवाचे पाय धरी

**प्रश्न 14 ते 16 साठी सूचना - खाली दिलेला संवाद वाचून त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायांतून निवडा.**

''सूरज, तिकडे बघकोण आलंय.''
''येऊ दे, तू खेळाकडे लक्ष दे.''
''अरे, तुझी ताई आली आहे, मला वाटते तुलाच शोधत आहे ती.''
''ए अक्षय, सूरज दिसला का तुला ?''
''ताई, तो तिकडे कोर्टवर यशसोबत खेळतोय.''
''त्याला आज आईसोबत मामांकडे जायचंय.''
''पण ताई, उद्या तर त्याची बॅडमिंटनची मॅच आहे ना !''
''उद्या मामाचा वाढदिवस आहे. आजी-आजोबा पण आजच गावाहून आलेत, म्हणून आई आज चाललीये.''
सूरज ताईकडे जात म्हणाला, ''मी नाही जाणार आईसोबत. ताई, तूच जा !''
''पण आई तुझ्यासाठी थांबलीये, आता अंधार पण पडेल !''
''मला सराव करायचा आहे, मॅच नाही का उद्या ?''
''नुसता खेळतच असतो रे, अभ्यासाला जराही वेळ देत नाहीस !''
''पण ताई, खेळणंही तितकंच आवश्यक आहे ना !''
''ठीक आहे, तू थांब. मी सांगते आईला.''

Space for Rough Work

**14. वरील संवादात किती जणांचा उल्लेख आला आहे ?**

(1) आठ (2) चार

(3) पाच (4) सहा

**15. वरील संवाद घडला ती वेळ कोणती असावी ?**

(1) संध्याकाळ (2) रात्र

(3) सकाळ (4) दुपार

**16. सूरजला मामांकडे का जायचे नव्हते ?**

(1) मित्र जाऊ देत नव्हते म्हणून (2) त्याची मॅच होती म्हणून

(3) मामाचा वाढदिवस होता म्हणून (4) ताईचा राग आला होता म्हणून

**17. खाली दिलेल्या वाक्यामध्ये चुकीचा असलेला भाग पर्यायांतून निवडा :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अचानक | इतक्यात | जयेश ओरडला | "ए ऽ ऽ सा ऽ ऽ प | तो बघ." |
| अ | ब | क | ड | इ |

(1) इ (2) ड


(3) क (4) ब

**18. पुढीलपैकी समानार्थी शब्दांची अयोग्य जोडी असलेला पर्याय निवडा.**

(1) वात्सल्य – प्रेम (2) झिम्मड – रिमझिम

(3) पर्वा – फिकीर (4) सदावर्त – अन्नछत्र

**19. खालील शब्दकोड्यामध्ये गूढ, दृष्टी, निर्मिती या अर्थाचे शब्द मिळण्यासाठी अनुक्रमे कोणती अक्षरे येतील ?**




(1) ग, ज, च (2) म, ज, च

(3) ग, ज, का (4) क, का, का

Space for Rough Work

**20. रिकाम्या जागी योग्य अलंकारिक शब्द पर्यायांतून निवडा.**

आमच्या वर्गातील सर्वात कमी उंचीचा संजू म्हणजे .......... च जणू.

(1) कुंभकर्ण (2) भाट

(3) वामनमुर्ती (4) नारद

**21. 'उपकाराखाली दबलेला' या शब्दसमूहाबद्दल अचूक शब्द पर्यायांतून निवडा.**

(1) कृतज्ञ (2) अपकार

(3) पोरका (4) मिंधा

**22. पुढीलपैकी अयोग्य समूहदर्शक शब्द असलेला पर्याय निवडा.**

(1) पिकत घातलेल्या आंब्यांची – राई (2) केळींचा – घोस

(3) काजूंची – गाथण (4) लाकडांची – मोळी

**23. पुढील शब्द शब्दकोशातील क्रमाने लावले असता उजवीकडून दुसरा येणारा शब्द कोणता ?**

विश्व, विषय, विजार, विचार, विसंवाद

(1) विश्व (2) विषय

(3) विसंवाद (4) विजार

**24. पुढीलपैकी विरुद्धार्थी शब्दांची चुकीची जोडी ओळखा.**

(1) यश × अपयश (2) सतेज × निस्तेज

(3) काळजी × चिंता (4) स्वातंत्र्य × पारतंत्र्य

**25. पुढीलपैकी कविता व कवी यांची अचूक जोडी निवडा.**

(1) कापणी – सरोजिनी बाबर (2) वासरू – बालकवी

(3) रानवेडी – तुकाराम धांडे (4) सुगी – बहिणाबाई चौधरी

Space for Rough Work

# विभाग II

## गणित

**26.** **''पाच कोटी नऊ लक्ष सत्त्याहत्तर हजार पाचशे नव्याण्णव'' या संख्येनंतर येणारी क्रमिक संख्या खालीलपैकी कोणती ?**

(1) 5,09,77,600 (2) 5,09,77,599

(3) 59,77,600 (4) 5,97,70,700

**27.** **0.561 हा दशांश अपूर्णांक कोणत्या दोन अपूर्णांकाच्या मध्ये आहे.**

(1) 0.5 व 0.56 (2) 0.50 व 0.60

(3) 0.562 व 0.57 (4) 0.56 व 0.57

**28.** **त्रिकोणाला 3 शिरोबिंदू तर दोन त्रिकोण जोडून तयार झालेल्या चौकोनाला किती शिरोबिंदू असतील ?**

(1) 6 (2) 4

(3) 2 (4) 1

Space for Rough Work

# Section II

## Mathematics

**26. Which number will occur consecutively after five crores nine lakhs seventy seven thousand five hundred and ninety nine ?**

(1) 5,09,77,600 (2) 5,09,77,599

(3) 59,77,600 (4) 5,97,70,700

**27. Between which two decimal fractions does 0.561 lie ?**

(1) 0.5 and 0.56 (2) 0.50 and 0.60

(3) 0.562 and 0.57 (4) 0.56 and 0.57

**28. A triangle has 3 vertices. If a rectangle is formed joining 2 triangles, how many vertices will it have ?**

(1) 6 (2) 4

(3) 2 (4) 1

Space for Rough Work

**29. उत्कर्ष सहकारी संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेला 2240 सभासदापैकी 35% स्त्रिया भागधारक सर्वसाधारण सभेला उपस्थित होत्या. जर सभेला 100% भागधारक उपस्थित असतील तर संस्थेच्या सर्वसाधारण सभेला किती पुरुष भागधारक उपस्थित होते ?**

(1) 1456 (2) 786

(3) 1356 (4) 1256

**30. 52 या संख्येचा मोठ्यात मोठा विभाजक हा त्याच्या लहानात लहान विभाजकाच्या किती पट आहे ?**

(1) 26 (2) 13

(3) 4 (4) 52

**31. 5 रुपयाची 30 नाणे देवून 10 रुपयाच्या किती नोटा मिळतील ?**

(1) 3 (2) 6

(3) 15 (4) 20

**32. 1 ते 9 या क्रमिक अंकापैकी कोणतेही सहा अंक प्रत्येकी एकदाच वापरून तयार होणारी मोठ्यात मोठी विषम संख्या व लहानात लहान समसंख्या यांची बेरीज किती ?**

(1) 1001110 (2) 1111101

(3) 1110110 (4) 1111100

Space for Rough Work

**29.** **For Annual General Meeting of Utkarsh Co-operative Society out of 2240 members 35% women share holders were present. If 100% share holders were present, then how many men share holders attended the annual general meeting of the society ?**

(1) 1456 (2) 786

(3) 1356 (4) 1256

**30.** **How many times is the greatest divisor of 52 is that of smallest divisor ?**

(1) 26 (2) 13

(3) 4 (4) 52

**31.** **How many notes of Rs. 10 can one get if one gives 30 coins of Rs. 5 ?**

(1) 3 (2) 6

(3) 15 (4) 20

**32.** **Form the greatest six digit odd number and smallest six digit even number using the digits from 1 to 9 only once. What will be the sum of these numbers ?**

(1) 1001110 (2) 1111101

(3) 1110110 (4) 1111100

Space for Rough Work

33. ओंकार परीक्षेत 510 गुण मिळवून उत्तीर्ण झाला. जर त्याला परीक्षेत 68% गुण मिळाले असतील तर ती परीक्षा किती गुणांची होती ?

(1) 510
(2) 680
(3) 750
(4) 800


34. $\frac{3}{5}, \frac{3}{2}, \frac{3}{8}, \frac{3}{7}$ या अपूर्णांकाची उतरत्या क्रमाने मांडणी केली असता सर्वात मोठा अपूर्णांक व सर्वात लहान अपूर्णांक यांच्यामधील फरक किती ?

(1) $\frac{18}{16}$
(2) $\frac{10}{6}$
(3) $\frac{3}{6}$
(4) 1

35. एका संख्येला 5 ने गुणण्याऐवजी 8 ने गुणले तेव्हा गुणाकार 39 ने वाढतो, तर ती संख्या कोणती ?

(1) 14
(2) 12
(3) 13
(4) 15

36. आकृतीत दाखविल्याप्रमाणे घडी घालून घनाकृती खोका तयार केल्यास **'R'** अक्षर असलेल्या पृष्ठाच्या विरुद्ध पृष्ठावर कोणते अक्षर येईल ?




(1) L
(2) A
(3) I
(4) U

Space for Rough Work

33. **Onkar passed an exam scoring 510 marks. If he has 68% marks then for how many marks was the exam conducted ?**

(1) 510 (2) 680

(3) 750 (4) 800

34. **What is the difference between the greatest and the smallest fraction if $\frac{3}{5}, \frac{3}{2}, \frac{3}{8}, \frac{3}{7}$ are arranged in descending order ?**

(1) $\frac{18}{16}$ (2) $\frac{10}{6}$


(3) $\frac{3}{6}$ (4) 1

35. **If a number is multiplied by 8 instead of 5, the product increases by 39, then what is the number ?**

(1) 14 (2) 12

(3) 13 (4) 15

36. **A paper is folded according to the figure and a cubical box is made. Which letter will be there opposite to the surface with the letter "R" ?**




(1) L (2) A

(3) I (4) U

Space for Rough Work

**37. खालीलपैकी चुकीची पदावली कोणती ?**

(1) $7 \times 8 \div 4 = 14$
(2) $27 \div 3 \times 3 = 9$
(3) $18 - 13 + 5 = 10$
(4) $16 + 5 - 12 = 9$

**38. जोसेफने साडेतीन रुपयाला एक पेन्सिल या दराने अर्धा डझन पेन्सिली व साडेबारा रुपयांचा एक पेन या दराने दोन पेन विकत घेतले. दुकानदाराला पन्नास रुपयाची नोट दिली तर दुकानदार जोसेफला किती रुपये परत करेल ?**

(1) 46
(2) 34
(3) 4
(4) 25

**39. ऋतुजाने प्रणवला द.सा.द.शे. 8 दराने 2500 रुपये 6 महिन्यासाठी सरळव्याजाने दिले तर प्रणव ऋतुजाला 6 महिन्याचे किती व्याज देईल ?**

(1) 100 रुपये
(2) 500 रुपये
(3) 200 रुपये
(4) 600 रुपये

**40. 26586 या संख्येमधील हजार व दशक स्थानच्या अंकाच्या स्थानिक किंमतीची बेरीज आणि शतक व दशक स्थानच्या अंकाच्या स्थानिक किंमतींची बेरीज यातील फरक किती ?**

(1) 5920
(2) 5500
(3) 6660
(4) 6080

**41. मगनशेठने 52 लीटर दूध 2184 रुपयाला विकले असता त्यांना 364 रुपये नफा झाला. तर मगनशेठने दूध किती रुपये प्रती लीटर दराने विकत घेतले असेल ?**

(1) 1820
(2) 45
(3) 42
(4) 35

Space for Rough Work

**37. Which of the following expressions is wrong ?**

(1) $7 \times 8 \div 4 = 14$
(2) $27 \div 3 \times 3 = 9$
(3) $18 - 13 + 5 = 10$
(4) $16 + 5 - 12 = 9$

**38. Joseph bought half a dozen pencils at the rate of Rs. 3.50 per piece and 2 pens at the rate of Rs. 12.50 per pen. If he gives Rs. 50 to the shopkeeper, how much money will he get back ?**

(1) Rs. 46
(2) Rs. 34
(3) Rs. 4
(4) Rs. 25

**39. Rutuja gave Pranav Rs. 2500 on simple interest for 6 months at the rate of 8% p.a. How much interest will Pranav pay to Rutuja for 6 months ?**

(1) Rs. 100
(2) Rs. 500
(3) Rs. 200
(4) Rs. 600

**40. What is the difference between the sum of the place value of the digits in thousands and tens place in the number 26586 and the sum of place value of digits in the hundreds and tens place ?**

(1) 5920
(2) 5500
(3) 6660
(4) 6080

**41. Magansheth sold 52 litres of milk for Rs. 2184 and earned a profit of Rs. 364. Find the cost price of milk per litre.**

(1) Rs. 1820 per litre
(2) Rs. 45 per litre
(3) Rs. 42 per litre
(4) Rs. 35 per litre

Space for Rough Work

**42.** **एका आयताकृती खोलीची लांबी व रुंदी अनुक्रमे 4 मीटर व 3 मीटर आहे. त्यां वर्गखोलीत 40 सेमी बाजू असलेल्या चौरसाकृती फरशा बसवावयाच्या आहेत तर एकूण वर्गखोलीसाठी किती फरशा लागतील ?**

(1) 50 (2) 100

(3) 75 (4) 400

**43.** **30 मीटर लांबीच्या दोरीला 5 ठिकाणी समान अंतारावर कापले असता दोन तुकड्यांची लांबी किती ?**

(1) 6 मी. (2) 10 मी.

(3) 5 मी. (4) 18 मी.

**44.** **32321, 32312, 32231, 32123 या संख्या उतरत्या क्रमाने लावल्यास पहिली व तिसरी संख्या यांची बेरीज किती ?**

(1) 64435 (2) 64444

(3) 64552 (4) 64543

**45.** **एक शर्ट 400 रुपयाला विकल्यास विक्रीच्या $\frac{3}{8}$ पट नफा झाला. तर त्या वस्तूची खरेदी किंमत किती ?**

(1) 150 रुपये (2) 550 रुपये

(3) 250 रुपये (4) 350 रुपये

**46.** **रोशनी दररोज पाव लीटर दूध विकत घेते. प्रती लीटर 50 रुपये या दराने तिचे ऑगस्ट महिन्याचे दुधाचे बिल किती रुपये होईल ?**

(1) 375 (2) 3875.0

(3) 375.50 (4) 387.50

Space for Rough Work

**42.** **The length and breadth of a rectangular room is 4 m and 3 m respectively. If this class room is to be tiled with square tiles whose side is 40 cm, how many tiles will be required ?**

(1) 50 (2) 100

(3) 75 (4) 400

**43.** **30 m long rope is cut at 5 places. What will be the length of 2 pieces ?**

(1) 6 m (2) 10 m

(3) 5 m (4) 18 m

**44.** **What will be the sum of the first and third number if the numbers 32321, 32312, 32231, 32123 are arranged in descending order ?**

(1) 64435 (2) 64444

(3) 64552 (4) 64543

**45.** **When a shirt is sold at Rs. 400, the profit earned is $\frac{3}{8}$ times the selling price. What is the cost price of the shirt ?**

(1) Rs. 150 (2) Rs. 550

(3) Rs. 250 (4) Rs. 350

**46.** **Everyday, Roshni buys $\frac{1}{4}$ litre of milk. What will be her bill amount for the month of August if the rate is Rs. 50 per litre ?**

(1) Rs. 375 (2) Rs. 3875.0

(3) Rs. 375.50 (4) Rs. 387.50

Space for Rough Work

**47.** खालील आकृतिबंध पाहून रिकाम्या जागी येणारा आकृतिबंध शोधा.

□ + ★, + ★ □, ★ □ +, .....?........

(1) □ + ★ (2) + □ ★

(3) □ ★ + (4) ★ + □

**48.** प्रज्ञाजवळ एकूण 5 डझन वह्या होत्या. त्यापैकी $\frac{1}{2}$ पट वह्या तिने अनुष्काला व $\frac{1}{5}$ पट वह्या प्रज्वलला दिल्या. तर तिच्याजवळ किती वह्या शिल्लक राहिल्या ?

(1) 60 (2) 12

(3) 18 (4) 30

**49.** श्रीकांतने 900 रुपयाचे घड्याळ खरेदी केले. त्याने दुकानदाराला 10 रु., 20 रु., 50 रु. व 100 रुपयाच्या समान नोटा दिल्या तर त्याने 20 रुपयाच्या एकूण किती नोटा दिल्या ?

(1) 20 (2) 4

(3) 5 (4) 10

**50.** मंगलाकाकूंनी 6016 लिंबाची रोपे विकत आणली. प्रत्येक रांगेत त्यांनी 47 रोपे लावली. तर त्या रोपांच्या किती रांगा तयार होतील ?

(1) 128 (2) 118

(3) 108 (4) 228

Space for Rough Work

**47. Complete the sequence observing the pattern. Choose the correct option.**

□+ ★, + ★ □, ★ □+, ......?......

(1) □+ ★ (2) +□ ★

(3) □ ★ + (4) ★ +□

**48. Pradnya had 5 dozen copies. She gave half of the copies to Anushka and $\frac{1}{5}$ times of the copies to Prajwal. How many copies are remaining with her ?**

(1) 60 (2) 12

(3) 18 (4) 30

**49. Shrikant bought a watch at Rs. 900. He gave equal number of notes of denomination Rs. 10, Rs. 20, Rs. 50 and Rs. 100. Find the number of notes of Rs. 20 that he gave to the shopkeeper.**

(1) 20 (2) 4

(3) 5 (4) 10

**50. Mangalakaku purchased 6016 saplings of lemon. She planted 47 saplings in each row. How many rows will be formed of those saplings ?**

(1) 128 (2) 118

(3) 108 (4) 228

Space for Rough Work

**51. 480 सेमी = किती डेका मीटर ?**

(1) 4.8 (2) 0.48

(3) 48 (4) 0.048

**52. 5 जानेवारीला मंगळवार आहे. तर त्या महिन्यात कोणता वार 5 वेळा येणार नाही ?**

(1) शुक्रवार (2) शनिवार

(3) रविवार (4) सोमवार

**53. एका आयताची लांबी व रुंदी अनुक्रमे 12 सेमी व 8 सेमी आहे. तर या आयताची परिमिती एवढी परिमिती असलेल्या चौरसाचे क्षेत्रफळ किती ?**

(1) 24 चौ.सेमी (2) 40 चौ.सेमी

(3) 100 चौ.सेमी (4) 96 चौ.सेमी

**54. ❄ □ Δ या चिन्हाच्या जागी अनुक्रमे कोणते अंक येतील ?**

```
   8 ❄ 2 Δ □
 - ❄ 5 □ 2 3
 -----------
   4 □ 5 □ 4
```

(1) 3, 7, 9 (2) 9, 7, 3

(3) 7, 9, 3 (4) 9, 3, 7

**55. द.सा.द.शे. काही दराने 5000 रुपयाचे 3 वर्षाचे सरळव्याज 1350 रुपये होते तर व्याजाचा दर किती ?**

(1) 5 (2) 8

(3) 9 (4) 7

Space for Rough Work

**51. 480 cm = ? Decameter.**

(1) 4.8 (2) 0.48

(3) 48 (4) 0.048

**52. 5th January is Tuesday. Which day of that month will not occur 5 times ?**

(1) Friday (2) Saturday

(3) Sunday (4) Monday

**53. The length and breadth of a rectangle is 12 cm and 8 cm respectively. What will be the area of square whose perimeter is equal to the perimeter of the given rectangle ?**

(1) 24 sq. cm (2) 40 sq. cm

(3) 100 sq. cm (4) 96 sq. cm

**54. Which numbers will occur in place of ❄ □ Δ ?**

```
  8 ❄ 2 Δ □
– ❄ 5 □ 2 3
  ---------
  4 □ 5 □ 4
```

(1) 3, 7, 9 (2) 9, 7, 3

(3) 7, 9, 3 (4) 9, 3, 7

**55. What will be the rate of interest if Rs. 5000 fetch Rs. 1350 as simple interest after 3 years ?**

(1) 5 p.c.p.a. (2) 8 p.c.p.a.

(3) 9 p.c.p.a. (4) 7 p.c.p.a.

Space for Rough Work

**56. L, X, V, D, C, M या रोमनसंख्या उतरत्या क्रमाने लिहा.**

(1) V, X, C, D, L, M (2) V, X, L, C, D, M

(3) C, D, L, M, V, X (4) M, D, C, L, X, V

**57. एक रीम कागदापैकी 5 दस्ते कागद प्रिन्टींगसाठी वापरले व 36 कागद प्रिन्टींग करतेवेळी खराब झाले तर किती कागद शिल्लक राहतील ?**

(1) 324 कागद (2) 360 कागद

(3) 320 कागद (4) 28 डझन

**58. गौरी, हमिदा, मेरी व ईश्वरी या मैत्रिणी वर्तुळाकार उभ्या आहेत. त्यांनी प्रत्येकी बरोबर हस्तांदोलन केल्यास एकूण किती हस्तांदोलने होतील ?**

(1) 3 (2) 4

(3) 5 (4) 6

**59. पुढीलपैकी चुकीचे विधान ओळखा.**

(1) कोणत्याही संख्येला 1 ने भागल्यास उत्तर तीच संख्या येते.

(2) कोणत्याही संख्येला त्याच संख्येने भागल्यास उत्तर शून्य येते.

(3) कोणत्याही संख्येला त्याच संख्येने भागल्यास उत्तर एक येते.

(4) भाजक व भागाकार यांच्या गुणाकारामध्ये बाकी मिळविल्यास 'भाज्य' मिळते.

Space for Rough Work

**56. Write the roman numerals L, X, V, D, C, M in descending order.**

(1) V, X, C, D, L, M
(2) V, X, L, C, D, M
(3) C, D, L, M, V, X
(4) M, D, C, L, X, V

**57. Out of 1 ream paper 5 quires were used for printing and 36 papers were wasted during printing. How many papers will remain ?**

(1) 324 papers
(2) 360 papers
(3) 320 papers
(4) 28 dozen

**58. Gauri, Hamida, Mary and Ishwari are friends. They are standing in a circular manner. They can shake hands with each other only once. How many times will the hand be shaken ?**

(1) 3
(2) 4
(3) 5
(4) 6

**59. Find the incorrect statement from the given alternatives.**

(1) When any number is divided by 1, quotient is the same number.


(2) When any number is divided by itself, quotient is zero.

(3) When any number is divided by itself, quotient is 1.

(4) When remainder is added to the product of divisor and quotient, one gets dividend.

Space for Rough Work

**60. खालीलपैकी कोणता अपूर्णांक आकृतीतील रेखांकित अपूर्णांकाचा सममूल्य अपूर्णांक दर्शवितो.**



(1) $\frac{33}{88}$  (2) $\frac{36}{60}$

(3) $\frac{45}{75}$  (4) $\frac{60}{100}$

**61. विज्ञान प्रयोगशाळा तयार करण्यासाठी केंद्रशासनाने प्रत्येक शाळेला 15,08,980 रुपये अनुदान देण्याचे ठरविले. महाराष्ट्रातील 168 शाळांसाठी एकूण किती रुपये अनुदान द्यावे लागेल ?**

(1) 24143680  (2) 253508640

(3) 27161640  (4) 102610640


**62. सकाळी 7.30 ला शाळेत आलेला निलेश शाळेतून 330 मिनिटांनी शाळेतून घरी जायला निघाला तर तो किती वाजता घरी जायला निघाला ?**

(1) साडेअकरा वाजता  (2) साडे दहा वाजता

(3) एक वाजता  (4) अकरा वाजता

Space for Rough Work

**60. Which of the following alternatives indicate the equivalent fraction to the shaded portion in the figure ?**



(1) $\frac{33}{88}$ (2) $\frac{36}{60}$

(3) $\frac{45}{75}$ (4) $\frac{60}{100}$

**61. Central Government granted aid Rs. 15,08,980 towards the provision of Science Laboratory per school. How much aid will be required for 168 schools in Maharashtra ?**

(1) Rs. 2,41,43,680 (2) Rs. 25,35,08,640

(3) Rs. 2,71,61,640 (4) Rs. 10,26,10,640

**62. Nilesh came to school at 7.30 in the morning. After 330 minutes in school, he started for home. At what time did he start moving home ?**

(1) 11.30 a.m. (2) 10.30 a.m.

(3) 1 o'clock (4) 11 o'clock

Space for Rough Work

**63. चैतालीचा जन्म 3 ऑगस्ट 2000 ला बुधवारी झाला. तर तिच्या दहाव्या वाढदिवसाला कोणता वार असेल ?**

(1) रविवार
(2) सोमवार
(3) मंगळवार
(4) शनिवार

**64. पोलिओ निर्मुलन अभियानामध्ये 2012 साली नागपूर जिल्ह्यात 317528 बालकांना व अमरावती जिल्ह्यात 204537 बालकांना पोलिओ डोस देण्यात आले तर एकूण किती बालकांना पोलिओ डोस देण्यात आले ?**

(1) 522605
(2) 522607
(3) 522065
(4) 522705

**65. गुरुस्मृति विद्यालयात 'सव्वा दोन हजार' विद्यार्थी शिकत आहेत. ही संख्या आंतरराष्ट्रीय संख्याचिन्हात कशी लिहाल ?**

(1) 22250
(2) २२५०
(3) २२२५०
(4) 2250

**66. साडे बाराशेचा 12% म्हणजे किती ?**

(1) 1500
(2) 144
(3) 150
(4) 200

**67. स्वराने 15980 रु. चा फ्रिज, 20740 रु. चा दूरदर्शन संच विकत घेतला. तिने 2000 रुपयाच्या 19 नोटा दुकानदारास दिल्या तर दुकानदार स्वराला 10 रुपयाच्या किती नोटा परत करेल ?**

(1) 1280
(2) 228
(3) 2280
(4) 128

**68. नानासाहेबांनी 32000 रुपयाला एक बैल विकत घेतला व त्याला घरी नेण्यासाठी वाहतूक खर्च 1500 रुपये आला. 3 महिन्यानंतर त्यांनी 35300 रुपयाला तो बैल विकला. तर या व्यवहारात नानासाहेबांना किती रुपये नफा झाला ?**

(1) 3300 रुपये
(2) 1800 रुपये
(3) 3000 रुपये
(4) 1500 रुपये

Space for Rough Work

**63. Chaitali was born on Wednesday 3rd August 2000. What will be the day on her tenth birthday ?**

(1) Sunday (2) Monday

(3) Tuesday (4) Saturday

**64. Under Polio Eradication Campaign 2012, in Nagpur district 3,17,528 children were vaccinated and in Amravati district 2,04,537 children were vaccinated. How many children were vaccinated in all ?**

(1) 5,22,605 (2) 5,22,607

(3) 5,22,065 (4) 5,22,705

**65. "Two and a quarter thousand" students study in Gurusmruti Vidhyalaya. Express this number in International numerals.**

(1) 22250 (2) २२५०

(3) २२२५० (4) 2250

**66. 12% of 1250 = ?**

(1) 1500 (2) 144

(3) 150 (4) 200

**67. Swara purchased a fridge at Rs. 15,980 and a T.V. set at Rs. 20,740. She gave 19 notes of Rs. 2000 to the shopkeeper. How many Rs. 10 notes will the shopkeeper return her ?**

(1) 1280 (2) 228

(3) 2280 (4) 128

**68. Nanasaheb purchased an ox for Rs. 32,000 and he had to spend Rs. 1500 on transportation to take it home. After 3 months he sold it at Rs. 35,300. How much profit did he earn in this transaction ?**

(1) Rs. 3300 (2) Rs. 1800

(3) Rs. 3000 (4) Rs. 1500

Space for Rough Work

**69.** $\frac{312}{1009} + \frac{706}{2018} + \frac{344}{1009} =$ **किती ?**

(1) $\frac{1362}{2018}$

(2) $\frac{1362}{4036}$

(3) $\frac{2018}{2009}$

(4) $\frac{2018}{2018}$

**70. 5 शतक + 3 दशक + 7 दशांश + 8 शतांश = किती ?**

(1) 530.078

(2) 530.78

(3) 53.78

(4) 503.078

**71. सहा अंकी सर्वात लहान विषम संख्या व सर्वात मोठी सहा अंकी सम संख्या यांची बेरीज किती ?**

(1) 109999

(2) 1099999

(3) 999999

(4) 99999

**72. एक गाडी नागपूर-अमरावती हे 150 किमी अंतर तीन तास पंधरा मिनिटांत पार करते. तर त्या गाडीला नागपूर-अकोला हे 250 किमी अंतर याच वेगाने पार करण्यासाठी किती वेळ लागेल ?**

(1) 2 तास 15 मिनिटे

(2) 3 तास 25 मिनिटे

(3) 5 तास 25 मिनिटे

(4) 4 तास 15 मिनिटे

Space for Rough Work

**69.** $\frac{312}{1009} + \frac{706}{2018} + \frac{344}{1009} = ?$

(1) $\frac{1362}{2018}$

(2) $\frac{1362}{4036}$

(3) $\frac{2018}{2009}$

(4) $\frac{2018}{2018}$

**70. 5 thousand + 3 tens + 7 tenth + 8 hundredth = ?**

(1) 530.078

(2) 530.78

(3) 53.78

(4) 503.078

**71. What is the sum of the smallest six digit odd number and the greatest six digit even number ?**

(1) 109999

(2) 1099999

(3) 999999

(4) 99999

**72. A car covers Nagpur - Amravati 150 km distance in 3 hrs and 15 min. How much time will it require to cover a distance of 250 km of Nagpur-Akola with the same speed ?**

(1) 2 hrs. 15 min


(2) 3 hrs. 25 min

(3) 5 hrs. 25 min

(4) 4 hrs. 15 min

Space for Rough Work

73. **20 सेमी बाजू असलेल्या चौरसाच्या रेखांकित भागाचे क्षेत्रफळ काढा.**



(1) 400 चौ.सेमी. (2) 100 सेमी.

(3) 200 चौ.सेमी. (4) 150 चौ.सेमी.

खालील चित्ररूप माहितीच्या आधारे प्रश्नांची उत्तरे ध्या.

| विद्यार्थ्यांना आवडणारा विषय | विद्यार्थी संख्या |
|---|---|
| गणित | ☺ ☺ ☺ ☺ |
| मराठी | ☺ ☺ ☺ |
| विज्ञान | ☺ ☺ |
| चित्रकला | ☺ ☺ ☺ ☺ |

प्रमाण : 1 ☺ = 6 विद्यार्थी

74. **चित्रालेखात एकूण किती विद्यार्थ्यांची माहिती दिली आहे.**

(1) 13 (2) 68

(3) 76 (4) 78


75. **विज्ञान विषय आवडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येपेक्षा गणित विषय आवडणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कितीने जास्त आहे ?**

(1) 2 (2) 12

(3) 24 (4) 8

Space for Rough Work

**73. Find the area of the shaded portion of the square whose side is 20 cm.**



(1) 400 sq. cm.  (2) 100 cm.

(3) 200 sq. cm.  (4) 150 sq. cm.

**Q. 74 & 75. Answer the following questions using the pictorial information.**

| **Subject liked by students** | **No. of Students** |
|---|---|
| Maths | ☺ ☺ ☺ ☺ |
| Marathi | ☺ ☺ ☺ |
| Science | ☺ ☺ |
| Drawing | ☺ ☺ ☺ ☺ |

Scale : 1 ☺ = 6 students

**74. What is the number of students about whom the information is given in pictorial diagram ?**

(1) 13  (2) 68

(3) 76  (4) 78

**75. By how much is the number of students liking Maths is more than that of the number of students liking science ?**

(1) 2  (2) 12

(3) 24  (4) 8

Space for Rough Work

Space for Rough Work